# महावीर मध्ये ''मराठी भाषा गौरव दिन' साजरा

**दिनांक:- २७ फेब्रुवारी २०२४**

**ठिकाण:- संघवी अभियांत्रिकी महाविदयालय, ग्रंथालय विभाग**

महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महावीर पॉलिटेक्निक आणि महावीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात नुकताच 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने तीनही महाविद्यालयांच्या वतीने ग्रंथालयात मराठी ग्रंथप्रदर्शने आयोजित करण्यात आली होती. ग्रंथप्रदर्शनांच्या उदघाटन प्रसंगी संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. अमोल लोखंडे, महावीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. अनिल जाधव आणि महावीर पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. संभाजी सगरे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. अमोल लोखंडे म्हणाले कि, "मराठी भाषेला ज्ञानभाषा होण्यासाठी कुसुमाग्रज यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. त्यांना मानाचा समजला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कारही त्यांच्या साहित्यामुळं प्रदान करण्यात आला. कुसुमाग्रजांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यांनी मराठी कवितेला नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे, मराठीही शिकण्याची भाषा व्हावी यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले म्हणूनच महाराष्ट्रात कविवर्य कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' दरवर्षी साजरा करण्यात येतो,आपण सर्वांनीही रोजच्या व्यवहारात मराठीचा अभिमान बाळगावा,मराठी भाषा समृध्द करण्यासाठी तसेच जोपसण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत." असे ते यावेळी म्हणाले. यावेळी कवि कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पार्पण करण्यात आले. महावीर पॉलिटेक्निकच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाकडूनही दैनंदिन संभाषणात मराठीचा अधिक अधिक वापर व्हावा यासाठी मराठी काव्य वाचन आणि मराठी भाषेवरील स्तुतिलेखांचे वाचन आयोजित करण्यात आले होते. "सार्वजनिक ठिकाणी जास्तीत जास्त मराठी बोला, सरकारी किंवा खाजगी सार्वजनिक क्षेत्रातील अर्ज; प्रतिक्रिया, तक्रारी मराठीतून द्या जमेल तिथे मराठीची ख्याती सांगा प्रचार करा, मराठी वाचन करा, मराठीत लेखन करा, मराठी संगीत ऐका असे यावेळी महावीर पॉलिटेक्निकचे डॉ.संभाजी सगरे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले यावेळी व्यासपीठावर विभागप्रमुख अनुप सोनवणे यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित या विविध कार्यक्रमांत सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. मराठी ग्रंथप्रदर्शनाच्या आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. वैशाली पाटील, ग्रंथपाल राजेंद्र आढाव, ग्रंथपाल प्रभावती महाले आणि सहाय्यक कांता महाले यांनी परिश्रम घेतले.

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी साक्षरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर


WELCOME
BOOK EXHIBITION
Organized by
SAMARTH
BOOKS & SALES
the ultimate book solution...
&
SHREE MAHAVIR EDUCATION SOCIETY'S
SANGHAVI COLLEGE OF ENGINEERING
ON 27 FEB 2024
Engineering | Management | Law
Medical | Pharmacy | Agriculture | Architecture
Science | Commerce | Fiction | Non-fiction |
| Competitive Exams |
Entrance Exam Books & Software
NEET/ CET/GATE/GRE/TOEFL
OFFICE : Shop No. 1, Krishna Apartment, Ganesh Colony,
Rane Nagar, New Nashik, Maharashtra, India - 422 009.
Web : www.samarthinfotech.co.in/books




WELCOME





## जिल्हाप्रमुखपद मिळताच कारवाई?

दरम्यान, पक्षाने बडगुजर यांना बढती देत नुकतीच जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर सोपवली. याला कारण म्हणजे, बडगुजर हे महानगरप्रमुख असताना त्यांनी नाशिक शहरात मजबूत केलेले पक्षसंघटन पाहता आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली. यानंतर बडगुजरांनी ग्रामीण भागात लागलीच पक्ष संघटनाला जोरदार सुरुवात केली. मात्र, त्यातच त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने यावरून चांगलेच राजकीय वातावरण तापले आहे.

महिलसोबतच व्हिड
झाला. त्याविषयी दे
केली नाही. पोलीस
करत असून, सत्ताध
विरोधकांना एक न्य



# 'महावीर'मध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महावीर पॉलिटेक्निक आणि महावीर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथप्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अमोल लोखंडे, प्राचार्य डॉ. अनिल जाधव आणि डॉ. संभाजी सगरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. अमोल लोखंडे म्हणाले की, कुसुमाग्रजांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांनी मराठी कवितेला नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे, मराठीही शिकण्याची भाषा व्हावी यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. म्हणूनच महाराष्ट्रात कविवर्य कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पार्पण करण्यात आले. महावीर पॉलिटेक्निकच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाकडूनही दैनंदिन संभाषणात मराठीचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी मराठी काव्य वाचन आणि मराठी भाषेवरील स्तुतिलेखांचे वाचन आयोजित करण्यात आले होते.

सार्वजनिक ठिकाणी जास्तीत जास्त मराठी बोला, सरकारी किंवा खासगी सार्वजनिक क्षेत्रातील अर्ज; प्रतिक्रिया, तक्रारी मराठीतून द्या जमेल तिथे मराठीची ख्याती सांगा प्रचार करा, मराठी वाचन करा, मराठीत लेखन करा, मराठी संगीत ऐका असे यावेळी महावीर पॉलिटेक्निकचे डॉ. संभाजी सगरे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी व्यासपीठावर विभागप्रमुख अनुप सोनवणे यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित या विविध कार्यक्रमांत सर्व विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

Librarian